जा.क्र.ज.सं.अ./ ५७५१/२०२२
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, २ रा मजला,
सस्मिरा इमारत, सस्मिरा मार्ग,
वरळी, मुंबई -४०००३०.
दिनांक - 08.09.2022

**विषय – जेष्ठ नागरिकांना सुविधा / सहाय्य पुरविणेबाबत**

पाहा - महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दि.०९.०७.२०१८

**परिपत्रक क्रमांक :- 595 दिनांक :- ०८.०९.२०२२**

भारताच्या संविधानातील राज्य धोरणाची निर्देशक तत्वावरील अनुच्छेद ३६ क व ४१ मध्ये जेष्ठ नागरिक सुस्थितीत असावा अशी तरतुद आहे. शासनाने जेष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांचा वृध्दापकाळ चांगल्या तऱ्हेने घालविता यावा, समाजामध्ये त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, शारिरीक/मानसिक आरोग्य सुस्थितीत राहावे, वृध्दापकाळामध्ये त्यांच्या आर्थिक क्षमता, कामाचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि सार्वजनिक मदत मिळवण्यासाठी जेष्ठ नागरिक धोरण, २०१३ यास मान्यता दिलेली आहे. सदर धोरणाच्या अंमलबजावणीबाबत दिनांक ०९.०७.२०१८ रोजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. सर्व धर्मादाय सह आयुक्त, धर्मादाय उप आयुक्त व सहायक धर्मादाय आयुक्त यांनी आपल्याकडील ६० वर्षावरील वृध्द अर्जदार/प्रतिवादी यांचे दावे प्राधान्य देऊन निकालात काढण्यावर भर द्यावा तसेच याबाबत कार्यालयांतील बार असोसिएशन सारख्या संस्थांनी यामध्ये पुढाकार व सर्वतोपरी सहकार्य करण्याबाबत कळविण्यात यावे.

२. सर्व विश्वस्तांना याद्वारे कळविण्यात येते की, वयोवृध्द व्यक्तींसाठी काम करणाऱ्या चॅरिटेबल संस्था/ट्रस्ट यांनी केलेले प्रयत्न यामध्ये त्यांची महत्वाची भुमिका असल्याने सर्व जेष्ठ नागरिकांसाठी काम करणाऱ्या संस्थांनी याबाबत योजना व कार्यक्रम यांची रचना, नियोजन आणि संनियंत्रण करावे. तसेच वयोवृध्द व्यक्तींचे सक्षमीकरण व पुर्नवसन याबाबतचे पंचवार्षिक व वार्षिक कार्यक्रम तयार करण्यात यावेत व त्यांचे कार्यान्वयन करावे आणि विधी व न्याय विभागाच्या नियंत्रित असणाऱ्या धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या आपली संस्था/ट्रस्ट नोंदणीकृत असणाऱ्या जिल्ह्यामध्ये याबाबतचा अहवाल सादर करावा व जिल्हास्तरीय कार्यालयाबरोबर संपर्कात रहावे.

३. सर्व अधिनस्त कार्यालये व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणीकृत संस्था/ट्रस्ट यांनी वयोवृध्द व्यक्तींच्या सामाजिक सुरक्षेच्या धोरणाची अंमलबजावणी करावी.

४. सर्व अधिनस्त कार्यालयांनी कार्यक्रम अंदाजपत्रका संबंधी माहिती वरिष्ठ कार्यालयास सादर करताना वृध्दांबाबतच्या कार्यक्रम व योजना याबाबतची माहिती स्वतंत्र प्रकरणामध्ये द्यावी.

५. सर्व अधिनस्त कार्यालयांनी जेष्ठ नागरिकांच्या समस्या निवारणामध्ये स्वंयसेवी संस्थांचा सततचा सहभाग अत्यंत मोलाचा असल्याने चॅरिटेबल ट्रस्ट, धार्मिक/ इतर संस्था यांना सेवा पुरविण्याचे कार्यक्षेत्र विस्तृत करण्यासाठी त्यांना प्रोत्साहीत करण्यात यावे तसेच कार्यालयात येणाऱ्या सर्व जेष्ठ नागरिकांना संस्था नोंदणी, न्यास नोंदणी, प्रमाणित प्रती इत्यादी सेवांची आवश्यकता असेल त्याबाबत वृध्दांना प्राधान्यक्रमाने सहाय्य करावे.

महेंद्र के.महाजन,
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत —

०१. सर्व धर्मादाय सह आयुक्त, धर्मादाय उप आयुक्त व सहायक धर्मादाय आयुक्त

०२. धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या सर्व जिल्हास्तरीय वकिल संघ/बार असोसिएशन (जिल्हास्तरीय कार्यालयाद्वारे)

०३. संगणक शाखा , मुख्यालय (संकेतस्थळावर अपलोड करणेसाठी )

०४. परिपत्रक नस्ती